# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५
दूरध्वनी क्र. (022) 2216 39 64 / 65 / 69, फॅक्स क्र. : (022) 2216 39 76
ई-मेल : mercindia@mercindia.org.in संकेतस्थळ : www.mercindia.org.in /www.merc.gov.in


जाहिरात क्र. ३/२०१३-१४

## जाहीर नोटीस

**सन २०११ चे प्रकरण क्र. १६**

**विषय : महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि. च्या मिहान विशेष आर्थिक क्षेत्रासाठीच्या प्रारुप वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी विनियमांवर जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्याबाबत**

महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि. यांना वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ अंतर्गत नागपूरमधील मिहान येथील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी ''विकासक'' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

विशेष आर्थिक विभाग अधिनियम, २००५ (SEZ Act) च्या कलम ४ च्या उप-कलम (१) सह विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ (ब) नुसार, महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि. (एमएडीसी) हे, भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, मिहान येथील विशेष आर्थिक क्षेत्रामधील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण यंत्रणेचे संचालन आणि देखभाल करण्यासाठी, मानीव वीज वितरण परवानाधारक आहे. आयोगाने सन २०११ च्या प्रकरण क्र. १६ मध्ये दि. ३ ऑगस्ट, २०१२ रोजी दिलेल्या आदेशान्वये महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि. यांना मानीव वीज वितरण परवानाधारक म्हणून मान्यता दिली आहे.

आयोगाने, विद्युत अधिनियम, २०१३ च्या कलम १६ अंतर्गत, प्रारुप वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी विनियम, २०१३ तयार केले आहेत. सदर प्रारुप वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी विनियम, २०१३ ची प्रत आयोगाचे संकेत-स्थळ **www.mercindia.org.in / www.merc.gov.in** येथे उतरवून घेण्याजोग्या स्वरुपात उपलब्ध आहे. आयोग, याद्वारे उपरोक्त प्रारुपांवर जनता / हितसंबंधितांकडून सूचना आणि हरकती मागवित आहे. या सूचना आणि हरकती (१ + ५ प्रतींमध्ये), सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५ (फॅक्स-०२२-२२१६ ३९७६; ईमेल- **madclicence2013@merc.gov.in**) या पत्त्यावर दि. ६ मे, २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील, अशा रीतीने पाठवाव्यात.

दि. ६ मे, २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेल्या सर्व सूचना आणि / किंवा हरकती आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

मुंबई
दिनांक : ६ एप्रिल २०१३

स्वाक्षरी/-
सचिव, मविनिआ

**Size : 10 (H) x 15 (H) = 150 SQC**